# मंत्रिमंडळ निर्णय

## बैठक क्र. ५५-५८

( विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशन (नागपूर) कालावधीतील बैठका )

**दिनांक : ६ डिसेंबर ते २१ डिसेंबर २०२३**

| बैठक क्रमांक | दिनांक | ठिकाण | निर्णयांची संख्या |
|---|---|---|---|
| ५५ | ०६-१२-२०२३ | रामगिरी निवासस्थान,नागपूर | ४ |
| ५६ | ०७-१२-२०२३ | रामगिरी निवासस्थान,नागपूर | ४ |
| ५७ | १४-१२-२०२३ | विधानभवन, नागपूर | ७ |
| ५८ | १९-१२-२०२३ | विधानभवन, नागपूर | १६ |
| | | एकूण | ३१ |

# मंत्रिमंडळ बैठक
# बुधवार, दि. ६ डिसेंबर २०२३
# एकूण निर्णय- ४

महसूल विभाग

## मुंबईतील मेट्रो-३साठी माहिमधील जागा

मुंबईतील माहिम विभागातील जागा मुंबई मेट्रो-३ प्रकल्पास देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

या निर्णयानुसार मेट्रोला ३ हजार ८६५ चौ.मीटर शासकीय जागा एमएमआरडीएस नाममात्र दराने तीस वर्षांच्या भाडेपट्ट्यावर देण्यात येणार आहे.

-----०-----

कौशल्य विकास विभाग

## कौशल्य विकास योजनांची सांगड घालण्यासाठी जागतिक बँकेच्या सहकार्याने -दक्ष॰ प्रकल्प

राज्यात व्यावसायीक शिक्षण, नाविन्यता आणि कौशल्य विकास योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी -मानवी विकासासाठी उपयोजित ज्ञान आणि कौशल्याचा विकास॰ (डेव्हलपमेंट ऑफ अप्लाईंड नॉलेज अँण्ड स्किल्स फॉर ह्युमन डेव्हलपमेंट - दक्ष) हा प्रकल्प राबवण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

राज्यात युवकांना विविध कौशल्यांचे प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगारक्षम बनविण्यात येत आहे. स्वयंरोजगारातून उद्योजक घडविण्यासाठी विविध योजना आणि कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. तसेच राज्य कौशल्य विद्यापीठाची स्थापना देखील करण्यात आली आहे. या सर्वांची सांगड घालण्यासाठी -दक्ष॰ प्रकल्प जागतिक बँकेच्या सहकार्याने राबवण्यात येईल. हा प्रकल्प २ हजार ३०७ कोटींचा असून १ हजार ६१५ कोटी रुपये जागतिक बँकेच्या कर्जाद्वारे आणि उर्वरित ६९२ रुपयांचा निधी राज्य शासनाकडून देण्यात येईल. या प्रकल्पासाठी कौशल्य व रोजगार विभाग प्रकल्प अंमलबजावणी संस्था म्हणून काम करेल. त्याचप्रमाणे प्रकल्प समन्वय समिती आणि राज्य सुकाणू समिती स्थापन करण्यात येईल.

-----०-----

वस्त्रोद्योग विभाग

## नागपूर एम्प्रेस मिलच्या जमीन विक्री निविदा प्रक्रियेस मान्यता

नागपूर येथील एम्प्रेस मिलच्या भूखंड क्र.१,२ व ८ या जमिनीच्या विक्रीची निविदा प्रक्रीया पूर्ण करण्यास आज मंत्रिंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. या जमिनीच्या विक्रीबाबत अटी व शर्तींचा पूरक करारनामा देखील या बैठकीत मान्य करण्यात आला.

वस्त्रोद्योग धोरणाप्रमाणे सोलापूर येथील नरसिंगजी गिरजी मिल आणि नागपूर येथील एम्प्रेस मिलच्या जमीनीचा विक्री करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या विक्रीतून मिळालेल्या निधीतून सोलापूर आणि नागपूर गारमेंट पार्क स्थापन करण्यात येईल आणि उर्वरित रक्कम वस्त्रोद्योग विकास कोषात जमा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार एम्प्रेस मिलच्या जमिनीच्या विक्रीची निविदा प्रक्रीया सुरु झाली आहे.

-----o-----

सहकार विभाग

## संत्रा निर्यातदारांना दिलासा देण्यासाठी पन्नास टक्के अनुदान

बांग्ला देशाला निर्यात होणाऱ्या संत्र्यावरील त्या देशाकडून आकारले जाणाऱ्या आयात शुल्काच्या पन्नास टक्के रक्कम अनुदान म्हणून देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. बांग्लादेशाने भारतातील संत्र्यावरील आयात शुल्कात वाढ केल्याने तेथील निर्यातीमध्ये घट होत आहे. यामुळे महाराष्ट्रातील संत्रा उत्पादकांना जास्तीत जास्त चांगला दर मिळावा म्हणून घेण्यात आला.

गेल्या तीन वर्षात १ लाख २ हजार ७९२ मेट्रीक टन संत्र्यांची भारतातून बांग्लादेश येथे निर्यात झाली. यामध्ये महाराष्ट्राचा वाटा ७७ हजार ९४ मेट्रीक टन इतका होता. बांग्लादेश येथे सध्या ८८ रुपये प्रति किलो इतके आयात शुल्क आकारले जाते. यातील पन्नास टक्के म्हणजेच ४४ रुपये प्रतिकिलो अनुदान राज्य शासनातर्फे दिले जाईल. अशा रितीने १६९ कोटी ६० लाख एवढा निधी आवश्यक असून, त्यास देखील बैठकीत मान्यता देण्यात आली.

-----o-----

# मंत्रिमंडळ बैठक
# गुरूवार, दि. ७ डिसेंबर २०२३
# एकूण निर्णय- ४

इतर मागास बहूजन कल्याण विभाग

**संतसेनाजी महाराज केशशिल्पी महामंडळास मंजूरी**

नाभिक समाजाच्या सामाजिक व आर्थिक विकासासाठी संतसेनाजी महाराज केशशिल्पी महामंडळ ही उपकंपनी स्थापन करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

या उपकंपनीचे कामकाज महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्त व विकास महामंडळाकडून चालवण्यात येईल. या उपकंपनीमार्फत २० टक्के बीज भांडवल योजना, एक लाखांपर्यंत थेट कर्ज योजना, वैयक्तिक कर्ज व्याज परतावा, दहा ते पन्नास लाख अशी गट कर्ज व्याज परतावा योजना, शैक्षणिक कर्ज व्याज परतावा, कौशल्य विकास प्रशिक्षण योजना, महिला स्वयंसिद्धी व्याज परतावा योजना अशा योजना राबवण्यात येतील. या महामंडळास पन्नास कोटी रुपयांचे भाग भांडवल मंजूर करण्यात आले असून, दरवर्षी पाच कोटी रुपये विविध योजना राबवण्यासाठी देण्यात येतील. या उपकंपनीसाठी बारा पदांना देखील मान्यता देण्यात आली आहे.

-----०-----

सहकार विभाग

**राज्यातील ११६ बाजार समित्यांमध्ये**
**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन उभारणार**

राज्यातील ११६ बाजार समित्यांमध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन उभारण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

सध्या राज्यातील ३०६ बाजार समित्यांपैकी १९० ठिकाणी शेतकरी भवनांची सुविधा आहे. राज्यातील सर्वच बाजार समित्यांमध्ये शेतकरी हे रात्री अपरात्री आपला शेतमाल घेऊन येतात. त्यांच्या मुक्कामाची तसेच आवश्यक मुलभूत सोयींची व्यवस्था या शेतकरी भवनात करण्यात येईल. हे भवन प्रत्येक बाजार समितीच्या ठिकाणी ४ हजार ५३६.२० चौरस फूट जागेवर उभे केले जाईल. त्याचप्रमाणे अस्तित्वात असलेल्या शेतकरी भवनांचे देखील दुरुस्ती करण्यात येईल. शेतकरी भवन बांधण्यासाठी -अ॰आणि -ब॰ वर्ग बाजार समित्यांना खर्चाच्या पन्नास टक्के तर -क॰ आणि -ड॰ वर्ग बाजार समित्यांना खर्चाच्या सत्तर टक्के शासन अनुदान देण्यात येईल. या नवीन भवनांच्या बांधकामांसाठी १०३ कोटी ९८ लाख आणि शेतकरी दुरूस्तीसाठी २८ कोटी ५० लाख याप्रमाणे १३२ कोटी ४८ लाख रुपयांच्या खर्चास देखील मान्यता देण्यात आली.

-----०-----

## परिविक्षा व अनुरक्षण संघटनेतील कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजना

महाराष्ट्र राज्य परिविक्षा व अनुरक्षण संघटनेतील कर्मचाऱ्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

या संस्थेत अनाथ, निराधार, बाल गुन्हेगार, भटके, भिक्षेकरी, रस्त्यावरील बालके अशा उपेक्षिलेल्या, नाकारलेल्यांना स्वीकारून त्यांची काळजी घेण्याचे काम केले जाते. या संघटनेच्या वेतनासाठी शंभर टक्के अनुदान शासनाकडून देण्यात येते. वर्ग ३ व ४ मधील पदांना पदोन्नतीची संधी नसल्याने अनेक कर्मचारी एकाच पदावर कार्यरत आहेत. १२ व २४ वर्षांनंतरची लाभाची आश्वासित प्रगती योजना देण्याचा निर्णय घेण्यात आला. यासाठी २० लाख २८ हजार इतक्या निधीच्या खर्चास मान्यता देण्यात आली.

-----o-----

महिला व बाल विकास विभाग

## पीडीत महिला, बालकांसाठी आता सुधारित मनोधैर्य योजना

बलात्कार, लैंगिक अत्याचारास बळी पडलेल्या महिला आणि बालकांना अर्थसहाय्य व त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी सध्याच्या मनोधैर्य योजनेमध्ये सुधारणा करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

सध्याच्या मनोधैर्य योजनेत ॲसिड हल्ल्यातील पीडीतेला अर्थसहाय्य देण्यात येते. मात्र आता पेट्रोल, डिझेल, रॉकेल, स्वयंपाकाचा गॅस अशा ज्वालाग्रही पदार्थांच्या हल्ल्यातील महिलांना देखील पूर्ण अपंगत्व आल्यास दहा लाख रुपयांची तसेच या संदर्भाने अन्य घटनांमधील पीडीतेला ३ लाखांपर्यंतचे अर्थसहाय्य मंजूर करण्यात येईल. याशिवाय अनैतिक व्यापार प्रतिबंधांसाठी पोलीस धाडीतून सुटका करण्यात आलेल्या १८ वर्षाखालील पीडीतेस देखील मनोधैर्य योजनेचा लाभ मिळेल. बलात्कार, बालकांवरील लैंगिक अत्याचार, ॲसिड हल्ला व ज्वालाग्रही व ज्वलनशील पदार्थांचा हल्ला यातील पीडीत महिला व बालकांना अर्थसहाय्य देऊन त्यांचे पुनर्वसन करण्यात येईल. या योजनेसाठी राज्य शासनातर्फे दरवर्षी महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांना निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

मनोधैर्य योजनेच्या अंमलबजावणी समितीच्या अध्यक्षपदी प्रमुख जिल्हा न्यायाधीश किंवा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण हे असतील. या समितीला महिन्यातून एक बैठक आयोजित करणे बंधनकारक राहील. पीडीत महिलेस अर्थसहाय्या व्यतिरिक्त इतरही सेवा पुरवण्यात येतील. पीडीतांचे पुनर्वसन तसेच व्यावसायीक प्रशिक्षण देण्याची जबाबदारी महिला व बालविकास आयुक्तांवर असेल. स्वतंत्र कक्षाद्वारे मनोधैर्य योजनेसंदर्भातील सनियंत्रण करण्यात येईल.

सुधारित मनोधैर्य योजनेत पीडीतांना खालीलप्रमाणे अर्थसहाय्य मंजूर करण्यात येईल. बलात्काराच्या अत्याचारात गंभीर इजा झाल्यास किंवा मृत्यू झाल्यास दहा लाखांपर्यंत व बलात्काराच्या इतर प्रकरणात तीन लाखांपर्यंत अर्थसहाय्य. पोस्को अंतर्गतही बालकांवरील लैंगिक अत्याचार प्रकरणातही गंभीर इजा झाल्यास किंवा मृत्यू झाल्यास दहा लाखांपर्यंत व बलात्काराच्या इतर प्रकरणात तीन लाखांपर्यंत अर्थसहाय्य दिले जाईल. ॲसिड हल्ल्यात चेहरा विद्रुप झाल्यास किंवा कायमचे अपंगत्व आल्यास दहा लाखांपर्यंत ॲसिड हल्ल्याच्या इतर प्रकरणात ३ लाखांपर्यंत अर्थसहाय्य. तसेच ज्वालाग्रही किंवा ज्वलनशील पदार्थांच्या हल्ल्यातील पीडीतांना विद्रूपता आल्यास किंवा कायमचे अपंगत्व आल्यास दहा लाखांपर्यंत ॲसिड हल्ल्याच्या इतर प्रकरणात ३ लाखांपर्यंत अर्थसहाय्य. या सुधारित मनोधैर्य योजनेसाठी १ कोटी ९३ लाख रुपये इतक्या निधीस मान्यता देण्यात आली.

-----०-----

# मंत्रिमंडळ बैठक
# गुरूवार, दि. १४ डिसेंबर २०२३
# एकूण निर्णय- ७

उच्च व तंत्रशिक्षण विभाग

## महाराष्ट्र ड्रोन मिशन राबवणार

राज्यात ड्रोन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून विविध विभागांची कामे करण्यासाठी -महाराष्ट्र मिशन॰ राबवण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. याकरिता पाच वर्षांसाठी आयआयटी मुंबई तसेच, विभागीय आणि जिल्हास्तरीय केंद्रांना उच्च व तंत्रशिक्षण विभागामार्फत निधी दिला जाईल. या मिशनसाठी २३८ कोटी ६३ लाख ४३ हजार इतका अंदाजित खर्च येईल.

ड्रोन केंद्रांचे जाळे राज्यभर तयार करून आयआयटी मुंबई येथे त्याचे मुख्यालय स्थापन करण्यात येईल. तसेच बारा ठिकाणी जिल्हास्तरीय, सहा ठिकाणी विभागीय ड्रोन केंद्रे स्थापन करण्यात येतील. प्रामुख्याने अर्थव्यवस्थेशी निगडीत विविध क्षेत्रांमध्ये या तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल. यामध्ये कृषि, पुरवठा व वितरण, आपत्ती व्यवस्थापन, वाहतुक नियंत्रण, सर्वेक्षण, सुरक्षा व्यवस्थेचे संनियंत्रण, नैसर्गिक साधन संपत्तीचे व्यवस्थापन याचा समावेश आहे. ड्रोनच्या वापरासाठी केंद्र शासनाच्या नागरी उड्डान महासंचालनालयाने मार्गदर्शक तत्वे तयार केली आहेत. त्याचप्रमाणे उड्डान क्षेत्रासाठी ग्रीन झोन, येलो आणि रेड झोन तयार करण्यात आले आहेत. जिल्हा, विभाग आणि मुख्यालयांमध्ये यासाठी मनुष्यबळ नियुक्त करण्यात येईल. तसेच विविध शैक्षणिक उपक्रम देखील राबवण्यात येतील. महाराष्ट्र ड्रोन मिशनच्या अंमलबजावणी संदर्भात मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली संनियंत्रण समिती गठीत करण्यात येत आहे.

-----०-----

उच्च व तंत्रशिक्षण विभाग

## रिद्धपूर येथे मराठी भाषा विद्यापीठ

अमरावती जिल्ह्यातील रिद्धपूर येथे मराठी भाषा विद्यापीठ स्थापन करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. यासाठी २२ कोटी ५० लाख रुपयांच्या खर्चास देखील मान्यता देण्यात आली.

हे विद्यापीठ पुढील शैक्षणिक वर्षांपासून रिद्धपूर येथे एमटीडीसीच्या इमारतींमध्ये तात्पुरत्या स्वरुपात सुरु करण्यात येईल. वर्धा येथे हिंदी भाषेचे विद्यापीठ असून, आंध्र प्रदेशात तेलुगू विद्यापीठ आहे. अन्य प्रांतात देखील भाषेची विद्यापीठ आहेत. त्यानुसार रिद्धपूर येथे मराठी भाषा विद्यापीठ स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. विद्यापीठाचे स्वरुप एकल असेल. महाविद्यालयांचे संलग्नीकरण असणार नाही. मात्र या

विद्यापीठाची मुंबई, पुणे, पंढरपूर, धुळे, नाशिक, अंबाजोगाई, नांदेड, औंध, गडचिरोली, सावंतवाडी अशी दहा प्रादेशिक उपकेंद्रे असतील. या विद्यापीठासाठी एकूण २४२ पदांची निर्मिती करण्यात येईल.

या विद्यापीठात भाषा व लिपी विज्ञान, भाषा शिक्षण, भाषांतर विद्या व तौलनिक साहित्य अभ्यास, सर्जनशील साहित्य निर्मिती, व्यावसायीक मराठी विद्याशाखा, आंतरज्ञानशाखीय साहित्यभ्यास, महाराष्ट्र विद्याभ्यास शाखा, संस्कृती, कला, सामाजिक शास्त्रे, वृत्तपत्र विद्या, वाणिज्य व व्यवस्थापन अशा विद्या शाखा असतील. याशिवाय मराठीच्या सर्व बोली भाषांचे संवर्धन, विदेशातील विद्यापीठे आणि संस्था यांच्या सहकार्याने भाषा संवर्धनाचे उपक्रम व देशातील मराठी भाषिकांच्या सांस्कृतिक परंपरांचे जतन व संवर्धनाचे काम देखील करण्यात येईल.

-----०-----

कौशल्य विभाग

## नागपूर, पुणे येथे खासगी कौशल्य विद्यापीठ स्थापनेस मान्यता

नागपूर व पुणे येथे खासगी कायम स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील कौशल्य विद्यापीठाची स्थापना करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

अंकुश शिक्षण संस्था यांना नागपूर येथे तर एस.जी. आर. फाऊंडेशन नागपूर या मंडळास पुणे येथे एच. रायसोनी स्किल टेक् युनीव्हर्सिटी हे खासगी कौशल्य विद्यापीठ हे खासगी कौशल्य विद्यापीठ मान्यता देण्यात आली.

-----०-----

उच्च व तंत्रशिक्षण विभाग

## स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठांसाठी आता एकच कायदा

राज्यात स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठ स्थापन करण्यासाठी अधिनियम तयार करून एकच कायदा आणण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठांच्या कामकाजाचे विनियमन करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. देशातील तेलंगणा, गोवा, उत्तरप्रदेश, गुजरात, तमिळनाडू या राज्यात स्वयं अर्थसहाय्यित खासगी विद्यापीठांची स्थापना करण्यासाठी एकच अधिनियम आहे. तसेच राज्यातील पारंपरिक विद्यापीठाच्या कामकाजासाठी देखील महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम अस्तित्वात आहे. याच धर्तीवर महाराष्ट्र खासगी विद्यापीठ अधिनियम तयार करण्यात येईल.

त्यामुळे आतापर्यंत राज्यात स्थापन झालेल्या २८ स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठांचे अधिनियम रद्द होतील आणि त्यांना या नव्या अधिनियमांमध्ये समाविष्ट करण्यात येईल.

-----०-----

उच्च व तंत्रशिक्षण विभाग

**महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ अधिनियमास मान्यता**

कला संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व शासनमान्य विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित कला संस्थांचे संनियंत्रण योग्य रितीने करता यावे यासाठी महाराष्ट्र राज्य कला शिक्षण अधिनियमास मान्यता देण्याचा निर्णय आज मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

तंत्रशिक्षण संचालनालयाच्या पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांसाठी तयार करण्यात आलेल्या एमएसबीटीई च्या धर्तीवर कला संचालनालयाच्या प्रमाणपत्र व पदविका अभ्यासक्रमांच्या कला संस्थांसाठी हा अधिनियम लागू राहील. याकरिता महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळामध्ये २६ पदे समायोजित करण्यात येतील. तसेच पहिल्या टप्प्यात १५ तसेच दुसऱ्या टप्प्यात २२ पदे भरण्यात येतील. याकरिता येणाऱ्या २ कोटी २३ लाख २३ हजार ५६४ रुपये या खर्चास मंत्रिमंडळाने मान्यता देण्यात आली आहे.

-----०-----

ग्राम विकास विभाग

**यात्रास्थळे, तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी आता**
**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर योजना**

ग्रामीण भागातील यात्रास्थळे आणि तीर्थक्षेत्रांच्या विकासाचा कार्यक्रम आता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाने राबवण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

सध्या ग्रामीण भागातील यात्रा स्थळांच्या विकासासाठी विशेष कार्यक्रम ही योजना यापुढे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यात्रास्थळ योजना या नावाने राबवण्यात येऊन सध्याची दोन कोटी रुपयांची मर्यादा पाच कोटी रुपये करण्यात येईल. तसेच ग्रामीण भागातील तीर्थक्षेत्रांच्या विकासाठी विशेष कार्यक्रम ही योजना यापुढे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजना या नावाने राबवण्यात येऊन, सध्याची पाच कोटींची मर्यादा पंचवीस कोटी रुपये इतकी करण्यात येईल.

-----०-----

## पुणे मेट्रो टप्पा-१ च्या सुधारित खर्चास मान्यता

पुणे मेट्रो टप्पा-१ साठी सुधारित खर्चास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

या प्रकल्पाचा मुळ खर्च ११ हजार ४२० कोटी रुपये होते. यात वाढ होऊन तो १३ हजार ६५६ कोटी इतका सुधारित खर्च झाला आहे. भुसंपादनाकरिता २६१ कोटी ७० लाख, हडपसर व विमाननगर येथील अतिरिक्त पुनर्वसनासाठी २२८ कोटी ८१ लाख तसेच केंद्र व राज्य करांकरिता १११ कोटी सहा लाख अशी एकूण ६०१ कोटी ५९ लाख रक्कम राज्य शासनाकडून महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशनला बीनव्याजी दुय्यम कर्ज म्हणून देण्यास मान्यता देण्यात आली.

या प्रकल्पाच्या ३३.२८ किलोमीटर लांबी पैकी २३.६६ किमी लांबीची मेट्रो वाहतुक सुरु झाली आहे. तसेच ९.६२ किमीची मार्गिकेचे काम सुरु आहे.

-----o-----

## मंत्रिमंडळ बैठक
## मंगळवार, दि. १९ डिसेंबर २०२३
## एकूण निर्णय- १६

वस्त्रोद्योग विभाग

### अमरावतीतील वासुदेव सहकारी सूतगिरणीस अर्थसहाय्य

अमरावती जिल्ह्यातील अंजनगाव सूर्जी तालुक्यातील वासुदेस सहकारी सूतगिरणीस शासकीय अर्थसहाय्य देण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

या संदर्भात वस्त्रोद्योग मंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळ उपसमितीत निर्णय झाला होता. या सूतगिरणीस सभासद भागभांडवल, शासकीय भागभांडवल आणि वित्तीय संस्थांचे कर्ज यांच्या विहीत गुणोत्तरानुसार राज्य शासनाचे अर्थसहाय्य देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

-----०-----

मृद व जलसंधारण विभाग

### धुळे जिल्ह्यातील न्याहळोद योजनेस मान्यता

धुळे जिल्ह्यातील न्याहळोद (पांझरा नदी) गेटेड सिमेंट काँक्रीट बंधाऱ्याच्या कामास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

या बंधाऱ्यामुळे २१ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार असून, ९८.९१ स.घ.मी. इतकी साठवण क्षमता निर्माण होणार आहे. या कामासाठी १६ कोटी ७ लाख ६० हजार रुपये इतका खर्च अपेक्षित आहे.

-----०-----

जलसंपदा विभाग

### पाडळसे निम्न तापी प्रकल्पास सुधारित मान्यता

जळगाव जिल्ह्यातील अमळनेर तालुक्यातील निम्न तापी प्रकल्प, पाडळसे या प्रकल्पास चौथी सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

तापी नदीवरील या प्रकल्पाचे काम १९९९ पासून सुरु असून, सध्या १२.९७ द.ल.घ.मी. मृत जलसाठा निर्माण झाला आहे. या प्रकल्पामुळे अमळनेर, चोपडा, पारोळा, धरणगाव, धुळे व सिंदखेडा तालुक्यांना लाभ होणार आहे. तसेच ४३ हजार ६०० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. या प्रकल्पासाठी ४ हजार ८९० कोटी रुपयांच्या खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

-----०-----

क्रीडा विभाग

## हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या अभिमत क्रीडा विद्यापीठासाठी शासन हमी

अमरावती येथील श्री. हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या डिग्री कॉलेज ऑफ फिजीकल एज्युकेशन या संस्थेस अभिमत क्रीडा विद्यापीठाचा दर्जा देण्याचा प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोगाकडे सादर करण्यात येणार असून, त्याकरिता आवश्यक ते वेतन अनुदान देण्याकरिता शासन हमीस आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

या संस्थेची स्वतःच्या मालकीची १२५ एकर जमीन असून, अद्ययावत सुविधांनी सूसज्ज असे क्रीडा संकुल आहे. तसेच उत्कृष्ट शैक्षणिक संस्था म्हणून पुरस्कारही प्राप्त झाला आहे.

-----०-----

गृहनिर्माण विभाग

## झोपडपट्टी पुनर्वसनातील सदनिका पाच वर्षानंतर विक्री करता येणार

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील लाभार्थींना पाच वर्षांच्या कालावधीनंतर त्यांची सदनिका किंवा गाळा विकण्यास परवानगी देण्याचा निर्णय आज मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. सध्या ही काल मर्यादा दहा वर्षांची आहे. त्यानुषंगाने झोपडपट्टी पुनर्वसन अधिनियमात सुधारणा करण्यात येईल. मंत्रिमंडळ उपसमितीच्या शिफारशी नुसार पात्र लाभार्थ्यांना त्यांच्या पुनर्वसित सदनिका किंवा गाळ्याचा ताबा मिळाल्यापासून सात वर्षांच्या कालावधीनंतर ती विकण्याची परवानगी दिली होती. मात्र या संदर्भातील विधेयकावर यंदाच्या पावसाळी अधिवेशनात चर्चा होऊ शकली नाही. दरम्यान सात वर्षांची प्रस्तावित तरतूद कमी करून पाच वर्षे करण्याबाबत लोकप्रतिनिधींकडून सातत्याने मागणी होत असल्यने याबाबतचा निर्णय घेण्यात आला.

-----०-----

गृह विभाग

## पोलीस दळणवळण, मोटार परिवहन विभागासाठी आस्थापना मंडळे

पोलीस दळणवळण व माहिती तंत्रज्ञान विभाग आणि मोटार परिवहन विभागासाठी आस्थापना मंडळे गठीत करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

सध्या गुन्हे अन्वेषण, राज्य गुप्तवार्ता, नागरी हक्क संरक्षण, लाच लुचपत प्रतिबंधक, राज्य राखीव पोलीस दल, दहशतवाद विरोधी पथक, महामार्ग वाहतूक, प्रशिक्षण संचालनालय या विभागांना आस्थापने मंडळे आहेत. मात्र मोटार परिवहन विभाग व पोलीस दळणवळण तसेच माहिती तंत्रज्ञान विभाग यांना आस्थापने मंडळे नसल्याने पोलीस अधिनियमात सुधारणा करून, त्यांचा समावेश करण्याचा निर्णय झाला.

-----०-----

कौशल्य विभाग

## वसईतील युनिव्हर्सल स्किल टेक विद्यापीठास मान्यता

वसई येथील विद्या विकास एज्युकेशन ट्रस्टच्या युनिव्हर्सल स्किल टेक युनीव्हर्सिटीस खासगी कायम स्वयं अर्थसहाय्यीत कौशल्य विद्यापीठ म्हणून स्थापन करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

हे विद्यापीठ २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून सुरू होईल.

-----०-----

वित्त विभाग

## अतिवृद्ध निवृत्तीवेतनधारकांच्या वेतनात भरीव वाढ

शासकीय सेवेतून निवृत्त झालेल्या अतिवृद्धांच्या निवृत्ती वेतनामध्ये वाढ करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. निवृत्ती वेतनाचे दर केंद्र शासनाप्रमाणे सुधारित करण्याबाबत महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाने विनंती केली होती.

राज्यातील ८० ते ८५ वर्षांच्या शासकीय निवृत्ती वेतनधारकांना मुळ वेतनात २० टक्के वाढ, ८५ ते ९० वयोगटातील निवृत्ती वेतनधारकांना ३० टक्के वाढ, ९० ते ९५ वर्षे वयोगटातील निवृत्ती वेतनधारकांना ४० टक्के वाढ, ९५ ते १०० वर्षे वयोगटातील निवृत्ती वेतनधारकांना ५० टक्के वाढ आणि १०० वर्षांवरील निवृत्ती वेतनधारकांना शंभर टक्के वाढ देण्यात येईल. हा निर्णय १ जानेवारी २०२४ पासून अमंलात येईल. यासाठी दरमहा १५ कोटी रुपये इतका अतिरिक्त खर्च येईल.

-----०-----

महिला व बालविकास विभाग

## समाजकल्याण बोर्ड कर्मचाऱ्यांचे
## वेतन राज्य शासनाकडून

महाराष्ट्र राज्य समाजकल्याण बोर्ड कार्यालय कायमस्वरुपी बंद करण्याबाबत प्रकीया सुरु असून, त्यातील कर्मचाऱ्यांच्या वेतन व निवृत्तीवेतन यांचा खर्च राज्य शासनाने करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

सध्या या बोर्डात १९ कर्मचारी असून, बोर्डाच्या मुख्यालयात २१ निवृत्ती वेतनधारक आहेत. या शिवाय केंद्राच्या हिश्श्याच्या वेतनेतर बाबींसह १ कोटी १ लाख रुपये इतका वार्षिक वित्तीय भार येणार आहे.

-----०-----

क्रीडा विभाग

## ऑलिम्पिक दर्जाचे खेळाडू
## घडविण्यासाठी -मिशन लक्ष्यवेध

ऑलिम्पिक पदकांचे ध्येय गाठण्यासाठी नियोजनबद्ध प्रयत्न करण्याकरिता -मिशन लक्ष्यवेध॰ ही महत्वाकांक्षी योजना सुरु करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

या योजनेसाठी १६० कोटी ४६ लाख ३५ हजार रुपये इतका खर्च येणार असून, जिल्हा वार्षिक योजनेतर्गंत क्रीडा विभागास दिल्या जाणाऱ्या एकूण तरतूदीच्या १० टक्के रक्कम या योजनेवर खर्च करण्यास मान्यता देण्यात आली. या मध्ये १२ प्रकारच्या खेळांकरिता आंतरराष्ट्रीय दर्जाच्या २४० खेळाडूंसाठी राज्यातील सहा ठिकाणी राज्यस्तरीय हाय परफॉर्मन्स सेंटर, राष्ट्रीय दर्जाच्या ७४० खेळाडूंसाठी ३७ विभागीय स्पोर्टस एक्सलन्स सेंटर आणि राज्य दर्जाच्या २हजार ७६० खेळाडूंसाठी जिल्हास्तरावर १३८ जिल्हा क्रीडा प्रतिभा विकास केंद्र स्थापन करण्यात येणार आहेत. याठिकाणी पायाभूत सुविधा व क्रीडा साहित्य देण्यात येईल. सरावासाठी क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येईल. याशिवाय स्पोर्टस सायन्स सेंटर, करिअर मार्गदर्शन, क्षमता विकास व खेळाडूंची निवड आणि प्रशिक्षण यावर देखील भर देण्यात येईल.

-----०-----

जलसंपदा विभाग

## टेंभू उपसा सिंचन योजनेसाठी सुधारित मान्यता

सातारा जिल्ह्यामधील कराड तालुक्यातील टेंभू उपसा सिंचन योजनेच्या ७ हजार ३७० कोटीच्या खर्चास तिसरी सुधारित मान्यता देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

कृष्णा नदीवर टेंभू गावाजवळ बॅरेज बांधून २२ अ.घ.फू. पाणी उचलून सातारा, सोलापूर व सांगली जिल्ह्यातील सात तालुक्यांमधील एकूण ८० हजार ४७२ हेक्टर क्षेत्रास सिंचन लाभ देण्यात येणार होता. मात्र सिंचन प्रकल्प लगतचे उंचावरील क्षेत्र सिंचनापासून वंचित होते. त्यामुळे अतिरिक्त ८ अ.घ.फू. इतक्या अतिरिक्त पाणी वापराच्या अनुषंगाने नव्या कामांचा समावेश करण्यात आला. या अतिरिक्त पाणी वापरातून सिंचनापासून वंचित एकूण ९४ गावांसाठी पाणी उपलब्ध करून देण्यात येईल. अशा प्रकारे सातारा, सोलापूर व सांगली या जिल्हयांमधील दहा तालुक्यांतील ३३४ गावांतील एकूण १ लाख २१ हजार ४७५ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ होणार आहे.

-----०-----

जलसंपदा विभाग

## चासकमान सिंचन प्रकल्पास सुधारित मान्यता

पुणे जिल्ह्यामधील खेड तालुक्यातील चासकमान सिंचन प्रकल्पास तिसरी सुधारित मान्यता देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. या प्रकल्पाकरिता १ हजार ९५६ कोटी ९५ लाख इतक्या खर्चा मान्यता देण्यात आली.

या प्रकल्पाची एकूण सिंचन क्षमता ४४ हजार १७० हेक्टर असून खेड तालुक्यातील ८ हजार २८३ हेक्टर व शिरूर तालुक्यातील ३५ हजार ८७७ हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळणार आहे. हे धरण ८.५४ अ.घ.फू. क्षमतेचे असून १९९३ मध्ये बांधून पूर्ण झाले. त्यामध्ये त्यावर्षीपासून १०० टक्के पाणीसाठा होत आहे. या प्रकल्पावरील ९० टक्के वितरण व्यवस्थेची कामे पूर्ण झाली असून, ९० टक्के सिंचन निर्मिती झाली आहे. परंतू केवळ २० टक्के भूसंपादन झाले असून, ८० टक्के भूसंपादन बाकी आहे.

-----०-----

वैद्यकीय शिक्षण विभाग

## करारावरील वैद्यकीय प्राध्यापकांच्या मानधनात वाढ

राज्यातील शासकीय वैद्यकीय आणि दंत महाविद्यालये व रुग्णालयातील करार पद्धतीने नियुक्त प्राध्यापक, तसेच सहयोगी प्राध्यापकांच्या मानधनात वाढ करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

शासकीय वैद्यकीय तसेच दंत महाविद्यालय व रुग्णालयातील करार पद्धतीने नियुक्त झालेल्या प्राध्यापकांना दरमहा एक लाख वीस हजार रुपये तसेच सहयोगी प्राध्यापकांना दरमहा एक लाख दहा हजार रुपये मानधन देण्यात येईल. सध्या रिक्त पदांवर कंत्राटी प्राध्यापकां पन्नास हजार रुपये व सहयोगी प्राध्यापकांना चाळीस हजार रुपये मानधन दिले जाते. सेवानिवृत्त अध्यापकांची करार पद्धतीने नियुक्ती झाल्यास त्यांना सामान्य प्रशासन विभागाच्या १७ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णय मधील तरतुदीनुसारच मानधन देण्यात येईल.

-----o-----

पर्यटन विभाग

## प्रत्येक जिल्ह्यातील युवकांना पर्यटन, आदरातिथ्य क्षेत्रातील प्रशिक्षण

राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील युवक, युवतींना पर्यटन क्षेत्रात प्रशिक्षण देऊन रोजगारक्षम बनवण्याच्या योजनेस आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

यासाठी सोलापूर येथील स्वामी समर्थ महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अँण्ड केटरिंग टेक्नॉलॉजी येथे नॅशनल कौन्सिल फॉर हॉटेल मॅनेजमेंट अँण्ड केटरिंग टेक्नॉलॉजीच्या मान्यतेने अभ्यासक्रम राबवण्यात येतील. याकरिता या महाविद्यालयात पद निर्मिती करण्यास देखील मान्यता देण्यात आली. त्याचप्रमाणे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण तालुक्यातील तारकर्ली येथे साहसी जलपर्यटन व आपत्कालीन बचाव प्रशिक्षण देण्यासाठी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ स्कूबा डायव्हींग ऑफ अँक्वेटीक स्पोर्टस या संस्थेच्या मार्फत प्रशिक्षण देण्यात येईल. मुंबईतील दादर येथील भारतीय पर्यटन एवंम् यात्रा प्रबंधन संस्थान, इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट तसेच उच्च व तंत्रशिक्षण विभाग, कौशल्य विकास विभागांतर्गत असलेल्या विविध संस्थांच्या माध्यमातून युवक, युवतींसाठी पर्यटन व आदरातिथ्य क्षेत्रातील प्रशिक्षण दिले जाईल. याकरिता २६ कोटी ५५ लाख रुपयांच्या निधीस मान्यता देण्यात आली.

-----o-----

महिला व बालविकास विभाग

**राज्यातील सर्व मिनी अंगणवाड्यांचे होणार श्रेणीवर्धन**

एकात्मिक बालविकास सेवेतील सर्व १३ हजार ११ मिनी अंगणवाडी केंद्रामध्ये श्रेणीवर्धन करण्यास मान्यता आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

या अंगणवाडी केंद्रांकरिता प्रत्येक एक या प्रमाणे १३ हजार ११ मदतनीसांची पदे देखील भरण्यात येतील. प्रत्येकी २५ अंगणवाडी केंद्रांसाठी मुख्य सेविका आणि पर्यवेक्षिका अशी एकूण ५२० पदे निर्माण करण्यात येतील. अंगणवाडी मदतनीसांना साडी व गणवेशाकरिता रक्कम दिली जाईल. त्याचप्रमाणे औषधोपचारांचे साहित्य-संच दिले जातील. याकरिता एकूण ११६ कोटी ४२ लाख रुपये खर्चास देखील मान्यता देण्यात आली आहे.

-----०-----

वित्त विभाग

**शहरांधील पायाभूत सुविधांच्या कामांसाठी**
**आता राष्ट्रीय आवास बँकेकडूनही कर्ज**

राज्यातील नगरपालिका, महानगरपालिका क्षेत्रांमध्ये पायाभूत सुविधांच्या कामांना वेग देण्यासाठी राष्ट्रीय आवास बँकेकडून कर्ज घेण्याच्या नागरी पायाभूत विकास निधी योजनेस आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

या प्रकल्पांना मंजूरी देणे व सनियंत्रण करण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती नेमण्यात आली आहे. ही समिती शहरांमधील पायाभूत सुविधा विकास कामांचा प्राधान्यक्रम ठरवेल तसेच कामांचा आढावा घेईल व शिफारशीही करेल. या योजनेत मंजूर झालेल्या कामांवर प्रथम संबंधित विभागाने आपल्या तरतुदीतून खर्च करावयाचा असून, याची प्रतिपुर्ती राष्ट्रीय आवास बँकेकडून करण्यात येईल.

-----०-----